# फिर्यादीचे शपथेवरील सत्यापन

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | – | बाबाजी नामदेव बांदल |
| वय | – | ६० वर्षे |
| व्यवसाय | – | शेती |
| राहणार | – | चिखली, पो. अडावळे, ता. पोलादपूर, जि. रायगड. |

दिनांक ०८/०६/२०२२ रोजी आमच्या गावामध्ये आमच्या भावकीचे देवस्थान भवानी, केदारनाथ, खंडोबा व वाघजाई या देवस्थानांबद्दल मिटींग सखाराम श्रीपत बांदल यांच्या घरी रात्री ८ ते १० दरम्यान झाली होती. सदरचे वर नमुद देवस्थानांचे मंदिर सर्वे क्र.१/६९ या जमिनीत २ गुंठे क्षेत्रात होते. सदरची जमीन माझ्या नावावर आहे व ती माझ्या वाटयाला आलेली आहे. वर नमुद मिटींग देवस्थानांचे मंदिराचे वाढीव बांधकाम करण्याबाबत होती. मंदिराचे वाढीव बांधकाम करण्यास माझा विरोध होता. तरी देखील आमच्या भावकीतील बापुराव नारायण बांदल, रमेश बाबु बांदल, शिवाजी गणपत बांदल व लक्ष्मण तुकाराम मोरे यांनी सदर मंदिराचे वाढीव बांधकाम माझा विरोध डावलुन केले. बापुराव बांदल याने सदर मिटींगमध्ये भावकीला सांगितले की, मी बांधकामाला विरोध करतोय, त्याला बघुन घ्या. त्यानंतर रमेश बाबु बांदल हा माझ्या अंगावर धावून आला. रमेश बांदल यास इतर लोकांनी अडवले व जागेवर बसविले. शिवाजी गणपत बांदल याने मला ”मादरच्योत, मला काय विरोध करतोस, भावकीच्या विरोधात जाशील तर तुझी खांडोळी करु“ असे म्हणाला. लक्ष्मण तुकाराम मोरे याने मला सर्व लोकांसमोर धमकी दिली की, ”गावाच्या विरोधात जाशील तर तुला महागात पडेल, गावच्या विरोधात

जाउ नको, तुला बघुन घेउ". त्यानंतर मला घरी जाण्यास सांगितल्याने मी घरी गेलो.

०२. त्यानंतर झालेल्या प्रकाराबद्दल मी दिनांक ०९/०६/२०२२ रोजी पोलादपूर पोलीस स्टेशनला गेलो. तेथे त्यांनी माझी तक्रार घेण्यास नकार दिला. त्यांनी मला सांगितले की, "आम्ही गावामध्ये येवून चौकशी करु". त्यानंतर मी दोन दिवस पोलीसांची वाट पाहिली पण पोलीस आले नाहीत. त्यानंतर दिनांक १२/०६/२०२२ रोजी मी पुन्हा पोलादपूर पोलीस स्टेशनला गेलो. मी त्यांना "वरिष्ठांकडे जातो" असे सांगितले. त्यानंतर त्यांनी माझी तक्रार नोंदवुन घेतली. पोलीसांनी माझ्या तक्रारीवरुन चॅप्टर केस नोंदविली. अखंड भावकीने मला बहिष्कृत केले आहे. त्यांनी मला कुलस्वामिनीच्या मंदिरात जाण्यास मज्जाव केला आहे. त्यामुळे माझ्या कुटूंबाशी सध्या कोणीही बोलत–चालत नाही. मी एकटाच असल्यामुळे केस दाखल करण्यास मला उशीर झाला. माझी जागा असताना भावकीच्या लोकांनी मला हटविण्याचा प्रयत्न केला आहे. म्हणुन मी ही केस दाखल केली आहे.

**फिर्यादीची सही**

सही/–
----------
(बाबाजी नामदेव बांदल)

माझे समक्ष नोंदविले.
श्रवणोत्तर स्वीकृत

सही/–
(**एस. एस. पाटील**)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, महाड

महाड
दिनांक – ०४/१०/२०२२